दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना निवडणूक/जनगणनेच्या कामामधून सूट देणेबाबत.

१४
२३/०२/२०२४

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे पूर्व, मुंबई-४०० ०५१
जा.क्र./प्राधि/परिपत्रक/ ३७६ /२०२४, दिनांक:- 22 FEB 2024

**सदंर्भ:** १.उपसचिव व सहमुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.ईएसटी-१२९९/५०८/२३, दि.२८/०६/१९९९.
२. उपसचिव सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०१० मूमंस-२०३/प्र.क्र.३३७/५, दि.२१.०९.२०१०.
३. महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना, शाखा म्हाडा यांचे पत्र क्र.१३, दि.२५/०१/२०२४.

**परिपत्रक**

दिव्यांग अधिकारी/ कर्मचारी यांना निवडणूक/जनगणना च्या कामाच्या नियुक्तीतून सूट देणेबाबत महाराष्ट्र शासनाच्या संदर्भ क्रमांक १ व २ अन्वये सूचना प्राप्त झालेल्या आहेत. संदर्भाधिन पत्र १ व २ नुसार प्राप्त सूचनांवर अंमलबजावणी प्राधिकरणांतर्गत असलेल्या काही प्रशासकीय विभागांकडून होत नसलेबाबत या कार्यालयाच्या निर्देशनास आले आहेत. यामुळे प्राधिकरणअंतर्गत असलेल्या दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना नाहक त्रासाचा सामाना करावा लागत असल्याबाबत महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना, शाखा म्हाडा यांचे संदर्भिय पत्र क्रमांक ३ अन्वये निवेदन प्राप्त झाले आहे. करिता विषयांकित प्रकरणी याव्दारे प्राधिकरणांतर्गत सर्व प्रशासकीय विभागांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

संदर्भ १ व २ अन्वये प्राप्त सर्व सूचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे. म्हाडातील दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांचे बाबत माहिती कळवित असताना त्यांच्या नावासमोर दिव्यांग म्हणून शेरांकित करण्यात यावे. तद्नंतरही जर दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांची अशी नियुक्ती अथवा तसे आदेश पारीत झाल्यास ते म्हाडा दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना न बजावता संबंधित आस्थापना किंवा विभागीय मंडळ स्तरावरून सदर निवड रद्द करणेबाबत पत्रव्यवहार करणेत यावा अथवा त्यांच्या जागी पर्यायी व्यवस्था आपल्या स्तरावरून करण्यात यावी.

सदरहू परिपत्रक सर्व अधिकारी/ कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावे.

**मा.उपाध्यक्ष/प्रा. यांच्या मान्यतेने...**

**(राजकुमार सागर)**
**सचिव/प्राधिकरण.**

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी**
१. मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२. मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ/मुं इ दु व पू मंडळ,
३. मुख्य अभियंता-१/२/३/प्रा.

४. विधी सल्लागार/प्रा.
५. वित्त नियंत्रक /प्रा.
६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी /प्रा.
७. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.
८. मुख्य अधिकारी. मुं झो सु मंडळ/कोकण मंडळ/पुणे मंडळ/
नाशिक मंडळ/नागपूर मंडळ/औरंगाबाद मंडळ/अमरावती मंडळ
९. उपमुख्य अभियंता, दक्षता व गुणनियंत्रक कक्ष /प्रा.
१०. चौकशी अधिकारी /प्रा.
११.सक्षम प्राधिकरण-१/२
१२.मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी**

१. सहमुख्य अधिकारी/मुं.मंडळ/मुं.इ.दु.व पु. मंडळ
२. प्रशासकीय अधिकारी/प्रा./मुं.मंडळ/मुं.इ.दु.व पु. मंडळ/मुं.झो.सु.मंडळ/ कोंकण मंडळ/ पुणे मंडळ/नागपूर मंडळ/ अमरावती मंडळ/ नाशिक मंडळ/ औरंगाबाद मंडळ.

**प्रत माहितीसाठी:-**

मा. उपाध्यक्ष/ प्रा. यांचे स्वीय सहाय्यक

**प्रत -**

**अध्यक्ष,** महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
प्रधान कार्यवाही, मागासवर्गीय कर्मचारी संघटना
अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा, मुंबई
अध्यक्ष, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड एम्पलॉईज को ऑप क्रेडीट सोसायटी लिं.मुंबई
अध्यक्ष महाराष्ट्र  राज्य अपंग कर्मचारी संघटना, शाखा म्हाडा